**राज्यसेवा परीक्षा-२०१७ आणि राज्यसेवा परीक्षा-२०१८ च्या अंतिम निकालाच्या आधारे शिफारसप्राप्त ठरलेल्या गट अ व गट ब मधील उमेदवारांच्या प्रशिक्षणासाठीचा अनुक्रमे <u>एकत्रित परिवीक्षाधीन</u> <u>प्रशिक्षण कार्यक्रम- ५</u> आणि <u>एकत्रित परिवीक्षाधीन</u> <u>प्रशिक्षण कार्यक्रम- ६</u>**

**मार्गदर्शक सूचना**

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांकः- टिआरएन- २०१८ / प्र. क्र.३५ /सीपीटीपी**

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक : २५ सप्टेंबर, २०१९

<u>वाचाः</u>

१. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. टिआरएन-२०१३/ प्र.क्र. ८४/१३/१२-अ, दिनांक २०.१.२०१४
२. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. टिआरएन ०२१६/ प्र.क्र. ५८/१७/ सीपीटीपी, दिनांक ४ जानेवारी, २०१७
३. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. टिआरएन ०५१७ / प्र.क्र. ३६/ सीपीटीपी , दिनांक २१.०७.२०१७.
४. शासन पत्र सामान्य प्रशासन विभाग क्रमांक- टिआरएन-०९२९/प्र.क्र.२९/सीपीटीपी-अ, दिनांक १७.०९.२०१९
५. शासन पत्र सामान्य प्रशासन विभाग क्रमांक टिआरएन-०६१८/प्र.क्र.५१/सीपीटीपी-ब, दिनांक १७.०९.२०१९
६. शासन पत्र सामान्य प्रशासन विभाग क्रमांक- टिआरएन-०९१९/प्र.क्र.३०/सीपीटीपी-अ, दिनांक १७.०९.२०१९
७. शासन पत्र सामान्य प्रशासन विभाग क्रमांक- टिआरएन-०९१९/प्र.क्र.५७/सीपीटीपी-ब, दिनांक १७.०९.२०१९

<u>प्रस्तावनाः</u>

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्यसेवा परीक्षेद्वारे सरळसेवेने गट अ आणि गट ब मध्ये नियुक्त होणाऱ्या विविध संवर्गातील परिवीक्षाधीन अधिका-यांचा एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम (सीपीटीपी) अनुक्रमे यशदा, पुणे आणि वनामती, नागपूर या प्रशिक्षण संस्थांमार्फत सुरु करण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय शासनाने उपरोक्त वाचा येथील अनु. क्र. १ येथील शासन निर्णयान्वये घेतलेला आहे. तसेच सीपीटीपी मध्ये प्रशिक्षण देण्यात येणा-या परिवीक्षाधीन अधिका-यांसाठी मुंबई विद्यापीठाशी संलग्न पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्याचा निर्णय उपरोक्त वाचा अ.क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये घेतला आहे.

२. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या राज्यसेवा परीक्षा-२०१७ अंतिम निकालाच्या आधारे शिफारसप्राप्त ठरलेल्या २५४ उमेदवारांचे (मुख्याधिकारी संवर्गातील उमेदवार वगळून) सीपीटीपी-५ या तुकडी अंतर्गत आणि राज्यसेवा परीक्षा - २०१८ च्या निकालान्वये शिफारसप्राप्त ठरलेल्या १२९ उमेदवारांचे सीपीटीपी-६ या तुकडी अंतर्गत प्रशिक्षण दिनांक ४.१०.२०१९ पासून सुरु होणार आहे. या अनुषंगाने या प्रशिक्षण कार्यक्रमांसाठी रुजू होणारे उमेदवार व संबंधित प्रशासकीय विभाग यांनी

करावयाच्या कार्यवाहीसाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यासंदर्भात शासन आता पुढीलप्रमाणे सूचना निर्गमित करीत आहे.

**<u>शासन परिपत्रकः-</u>**

राज्यसेवा परीक्षा-२०१७ व राज्य सेवा परीक्षा २०१८ च्या अंतिम निकालाच्या आधारावर शिफारसप्राप्त ठरलेल्या उमेदवारांसाठी आयोजित करण्यात येणा-या एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-५ (सीपीटीपी-५) व एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम -६ (सीपीटीपी ६ ) संबंधातील विविध मुद्द्यांबाबत पुढीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

**(एक) प्रशिक्षण सुरु करण्यासंदर्भातील मार्गदर्शक सूचनाः-**

१. उपरोक्त अनुक्रमांक ४ आणि ५ च्या शासन पत्रान्वये शिफारसप्राप्त उमेदवारांना सीपीटीपी-५ च्या प्रशिक्षणासाठी त्याचप्रमाणे उपरोक्त अनुक्रमांक ६ आणि ७ च्या शासन पत्रान्वये शिफारसप्राप्त उमेदवारांना सीपीटीपी-६ च्या प्रशिक्षणासाठी त्यांच्या चारित्र्य तपासणी आणि वैद्यकीय तपासणीच्या अधीन राहून तथापि, शैक्षणिक व इतर आवश्यक कागदपत्रांच्या पडताळणी करुन तात्पुरती नियुक्ती देण्यात येणार आहे.

२. सीपीटीपी-५ या तुकडीच्या प्रशिक्षणासाठी राज्यसेवा परीक्षा-२०१७ द्वारे शिफारसप्राप्त उमेदवारांनी दिनांक ३०.०९.२०१९ ते दिनांक १.१०.२०१९ या कालावधीत संबंधित प्रशिक्षण संस्थेमध्ये मूळ प्रमाणपत्रांच्या तपासणीसाठी उपस्थित राहण्याच्या सूचना अनुक्रमांक ४ व ५ वर नमूद केलेल्या शासन पत्रान्वये देण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे सीपीटीपी-६ या तुकडीच्या प्रशिक्षणासाठी राज्यसेवा परीक्षा-२०१८ द्वारे शिफारसप्राप्त उमेदवारांनी दिनांक २.१०.२०१९ ते दिनांक ३.१०.२०१९ या कालावधीत संबंधित प्रशिक्षण संस्थेमध्ये मूळ प्रमाणपत्रांच्या तपासणीसाठी उपस्थित राहण्याच्या सूचना अनुक्रमांक ६ व ७ वर नमूद केलेल्या शासन पत्रान्वये देण्यात आल्या आहेत. त्यानुसार सीपीटीपी-५ या तुकडीच्या प्रशिक्षणासाठी रुजू होणारे उमेदवार दिनांक ३०.०९.२०१९ ते दिनांक १.१०.२०१९ या कालावधीपैकी ज्या दिवशी कागदपत्र पडताळणीसाठी प्रशिक्षण संस्थेमध्ये उपस्थित राहील, त्या दिवसापासून सदर उमेदवार संबंधित पदावर हजर झालेला आहे, असे समजून त्या दिवसापासून ते दिनांक ३.१०.२०१९ पर्यंतचा कालावधी हा सदर उमेदवारांचा कर्तव्यार्थ कालावधी समजण्यात येईल. त्याचप्रमाणे सीपीटीपी-६ या तुकडीच्या प्रशिक्षणासाठी रुजू होणारे उमेदवार दिनांक २.१०.२०१९ ते दिनांक ३.१०.२०१९ या कालावधीपैकी ज्या दिवशी कागदपत्र पडताळणीसाठी प्रशिक्षण संस्थेमध्ये उपस्थित राहील, त्या दिवसापासून सदर उमेदवार संबंधित पदावर हजर झालेला आहे, असे समजून त्या दिवसापासून ते दिनांक ३.१०.२०१९ पर्यंतचा कालावधी हा सदर उमेदवारांचा कर्तव्यार्थ कालावधी समजण्यात येईल. प्रत्यक्ष प्रशिक्षण दिनांक ४.१०.२०१९ पासून सुरु होईल. उमेदवार प्रशिक्षण संस्थेमध्ये उपस्थित झाल्यापासून संबंधित संस्थेमध्ये निवासाची सोय उपलब्ध करुन देण्यात येईल.

३. राज्यसेवा परीक्षा-२०१७ चा अंतिम निकाल महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून दिनांक ७.०९.२०१९ रोजी जाहिर करण्यात आला. तद्नंतर राज्यसेवा परीक्षा-२०१७ च्या निकालान्वये शिफारप्राप्त उमेदवारांना संदर्भाधीन ४ व ५ येथील पत्रान्वये तात्पुरती नियुक्ती देण्यात आली आहे. त्यामुळे राज्य शासनाच्या सेवेत कार्यरत असलेल्या शिफारसप्राप्त उमेदवारांना प्रशिक्षणासाठी नवीन नियुक्तीच्या पदावर रुजू होण्याकरीता संबंधित विभागांनी उमेदवारांना दि. ३०.०९.२०१९ (मध्यान्ह पूर्व)

रोजी प्रशिक्षण संस्थेत उपस्थित राहण्याकरीता दिनांक २७.०९.२०१९ (मध्यान्होत्तर) दिनांक २८.०९.२०१९ व दिनांक २९.०९.२०१९ या दिवसांची रजा उपभोगून कार्यमुक्त करावे. याबाबत संबंधित उमेदवारांच्या दिनांक २८.०९.२०१९ व दिनांक २९.०९.२०१९ या दिवसांचे वेतन व भत्ते आहरीत करण्याबाबत कोणत्याही अडचणी येणार नाहीत याची दक्षता संबंधित विभाग / कार्यालयांनी घ्यावी.

त्याचप्रमाणे राज्यसेवा परीक्षा-२०१८ चा अंतिम निकाल महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून दिनांक १४.०२.२०१९ रोजी जाहिर करण्यात आला. तद्नंतर राज्यसेवा परीक्षा-२०१८ च्या निकालान्वये शिफारप्राप्त उमेदवारांना संदर्भाधीन ६ व ७ येथील पत्रान्वये तात्पुरती नियुक्ती देण्यात आली आहे. त्यामुळे राज्य शासनाच्या सेवेत कार्यरत असलेल्या शिफारसप्राप्त उमेदवारांना प्रशिक्षणासाठी नवीन नियुक्तीच्या पदावर रुजू होण्याकरीता संबधित विभागांनी दिनांक १.१०.२०१९ (मध्यान्होत्तर) पर्यंत कार्यमुक्त करावे.

सीपीटीपी-५ आणि सीपीटीपी-६ या तुकड्यांच्या प्रशिक्षणास रुजू होणा-या उमेदवारांच्या अनुषंगाने शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही -१०९२ / प्र. क्र. १०३३ / प्र. क्र.३३ /९२ /८, दिनांक २.१२.१९९७ अनुसार विहित केलेला १ महिन्याचा नोटीस कालावधी शिथील करण्यात येत आहे. तसेच शासन सेवेत असलेल्या उमेदवारांसाठी ते कार्यमुक्त झाल्याच्या दिनांकापासून प्रत्यक्षात प्रशिक्षण सुरु होईपर्यंतचा कालावधी कर्तव्यार्थ कालावधी म्हणून नियमित करण्यात येईल.

**(दोन) परिवीक्षाधीन प्रशिक्षणार्थींच्या वेतनाबाबतः-**

१. प्रशिक्षण कालावधीत सुरवातीच्या २३ आठवड्यांसाठी गट-अ संवर्गातील उमेदवारांना (पोलीस उपअधिक्षक/ सहाय्यक पोलीस आयुक्त, गट-अ संवर्ग वगळून) रु. ३०,०००/- आणि गट-ब संवर्गातील उमेदवारांना रु. २०,०००/- इतके ठोक वेतन अनुक्रमे यशदा, पुणे आणि वनामती, नागपूर यांचेमार्फत अदा करण्यात येईल. परिवीक्षाधीन कालावधीतील खातेनिहाय तांत्रिक प्रशिक्षण या टप्प्याचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर (एकूण २३ आठवड्यांनंतर) (सहायक पोलीस आयुक्त / पोलीस उपअधिक्षक यांच्याबाबतीत पायाभूत प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर) संबंधित विभागाकडे खातेनिहाय जिल्हा संलग्नता प्रशिक्षणाच्या टप्प्यासाठी हजर झाल्यापासून या उमेदवारांना नियमित वेतन संवर्गाच्या संबंधित प्रशासकीय विभागांकडून प्रदान करण्यात येईल. त्याचबरोबर आधीच्या २३ आठवड्यांच्या कालावधीत अदा करण्यात आलेली ठोक वेतनाची रक्कम आणि नियमित वेतन यामधील फरकाची रक्कम उमेदवारांना संबंधित विभागांकडून एक रकमी अदा करण्यात येईल. याअनुषंगाने संबंधित प्रशासकीय विभागांनी या प्रशिक्षणार्थीचे सेवार्थ प्रणालीमध्ये नोंदणी करणे, त्यांचे डीसीपीएस करीता क्रमांक मिळविणे तसेच या प्रशिक्षणार्थीच्या वेतनासाठी आहरण व संवितरण अधिकारी नियुक्त करणे इ. कार्यवाही परिवीक्षाधीन उमेदवारांचे तांत्रिक प्रशिक्षण संपण्यापूर्वीच पूर्ण करावी. जेणेकरुन परिवीक्षाधिन अधिकाऱ्यांना खातेनिहाय जिल्हा संलग्नता या टप्प्यावर रुजू झाल्यावर विनाविलंब नियमित वेतन प्रदान करणे शक्य होईल.

सहायक पोलीस आयुक्त / पोलीस उपअधिक्षक यांच्याबाबतीत पायाभूत प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांचे नियमित वेतन उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे गृह विभागामार्फत अदा करण्यात यावे.

२. गट-अ संवर्गातील अधिका-यांकरिता प्रति महिना प्रति अधिकारी रु.३०,०००/- याप्रमाणे तसेच गट-ब संवर्गातील अधिकाऱ्यांकरीता प्रति महिना प्रति अधिकारी रु. २०,०००/- याप्रमाणे एकत्रितरित्या **अग्रिम निधी** संवर्गाशी संबंधित प्रशासकीय विभागांनी प्रशिक्षण संस्थांना उपलब्ध करुन द्यावा. सदर

प्रशिक्षण दिनांक ४.१०.२०१९ पासून सुरु होणार असल्यामुळे दिनांक ४.१०.२०१९ ते दिनांक २२.०३.२०२० या कालावधीतील २४ आठवड्यांच्या वेतनासाठी माहे सप्टेंबर, २०१९ अखेर अग्रिम निधी संबंधित विभागांनी ग़ट अ संवर्गातील उमेदवारांसाठी यशदा, पुणे आणि गट ब संवर्गातील उमेदवारांसाठी वनामती, नागपूर यांना उपलब्ध करुन द्यावा.

३. प्रशिक्षणार्थींच्या वेतनासाठी संबंधित विभागांनी आहरण व संवितरण अधिकारी घोषित करावे व सदर आदेशाची प्रत सामान्य प्रशासन विभागास पाठवावी. घोषित केलेल्या आहरण व संवितरण अधिका-यांकडून प्रशिक्षणार्थींना वेळेत थकबाकी व वेतन मिळेल याची संबंधित विभागांच्या उपसचिवांनी दक्षता घ्यावी व सदर बाबतचा अहवाल सामान्य प्रशासन विभागास दर तीन महिन्यांनी सादर करावा.

४. सीपीटीपी-५ आणि सीपीटीपी-६ अंतर्गत दिनांक ४.१०.२०१९ पासून प्रशिक्षण सुरु होणार असल्यामुळे सर्व संबंधित विभागांनी प्रशिक्षणास रुजू होणा-या उमेदवारांची संख्या लक्षात घेऊन अधिसंख्य पदे निर्माण करण्याबाबतचे आदेश प्रत्यक्ष रुजू झालेल्या उमेदवारांची संख्या विचारात घेऊन तात्काळ निर्गमित करावेत.

**(तीन) परिवीक्षाधीन प्रशिक्षणार्थींकडून घेण्यात येणा-या बंधपत्राबाबतः-**

सीपीटीपी-५ आणि सीपीटीपी-६ या तुकड्यांच्या प्रशिक्षणासाठी रुजू होणा-या उमेदवारांकडून त्यांना प्रशिक्षणास रुजू करुन घेण्यापूर्वी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांकः टिआरएन ०५१४/प्र. क्र.७/१४/१८-ब, दिनांक २८ फेब्रुवारी, २०१७ मधील तरतूदींनुसार बंधपत्र सादर करणे अनिवार्य राहिल.

**(चार) सीपीटीपी-४ मध्ये प्रशिक्षण पूर्ण झालेल्या उमेदवारांसाठी .**

१. सीपीटीपी-४ मध्ये प्रशिक्षण पूर्ण केलेल्या गट-अ व गट-ब मधील प्रशिक्षणार्थींची राज्यसेवा परीक्षा-२०१७ किंवा राज्यसेवा परीक्षा-२०१८ च्या निकालाधारे गट-अ व गट -ब मधील अन्य संवर्गासाठी शिफारस करण्यात आली असेल व नवीन शिफारस केलेले पद घेण्यास संबंधित परिवीक्षाधीन अधिकारी इच्छूक असेल तर त्याने सामान्य प्रशासन विभाग़ आणि यशदा, पुणे तसेच वनामती, नागपूर यापैकी संबंधित प्रशिक्षण संस्थेला तसे तात्काळ कळवावे. अशा उमेदवारांची राज्यसेवा परीक्षा-२०१७ द्वारे नवीन पदावर निवड झाल्यास त्यांनी दिनांक ३०.०९.२०१९ ते दिनांक १.१०.२०१९ या कालावधीत संबंधित प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रमाणपत्रांसह उपस्थित राहून प्रमाणपत्रांची पडताळणी करून घ्यावी. तसेच सदर उमेदवारांची राज्यसेवा परीक्षा-२०१८ द्वारे नवीन पदावर निवड झाल्यास त्यांनी दिनांक २.१०.२०१९ ते दिनांक ३.१०.२०१९ या कालावधीत संबंधित प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रमाणपत्रांसह उपस्थित राहून प्रमाणपत्रांची पडताळणी करून घ्यावी. अशा उमेदवारांना उपरोक्त वाचा येथील अनुक्रमांक ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रशिक्षणाच्या टप्प्यामधून सूट देण्यासंदर्भातील कार्यवाहीबाबत संबंधित प्रशिक्षण संस्थांकडून पुढील सुचना देण्यात येतील.

**(पाच) परिवीक्षाधीन अधिका-यांची सेवाज्येष्ठता :**

पोलीस उपअधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त, गट-अ या संवर्गातील परिवीक्षाधीन अधिकारी वगळून इतर संवर्गातील परिवीक्षाधीन अधिका-यांची सेवाज्येष्ठता महाराष्ट्र नागरी सेवा [महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणा-या राज्य नागरी सेवा परीक्षेद्वारे गट “अ” आणि

गट ब" (राजपत्रित) या पदाकरिता निवड होऊन, सरळसेवेने नियुक्त होणा-या व एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमाअंतर्गत प्रशिक्षण घेणा-या उमेदवारांची सेवाज्येष्ठता निश्चित करणे] नियम, २०१५, दिनांक ७.११.२०१५ आणि दिनांक ३१.१२.२०१८ मध्ये नमूद केल्यानुसार निश्चित करण्यात येईल.

पोलीस उपअधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त, गट-अ या संवर्गातील परिवीक्षाधीन अधिका-यांची सेवाज्येष्ठता [महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणा-या राज्य नागरी सेवा परीक्षेद्वारे गट "अ" आणि गट "ब" (राजपत्रित ) या पदाकरिता निवड होऊन, सरळसेवेने नियुक्त होणा-या व एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमाअंतर्गत प्रशिक्षण घेणा-या उमेदवारांची सेवाज्येष्ठता निश्चित करणे] नियम, २०१५, दिनांक ७.०९.२०१८ मध्ये नमूद केल्यानुसार निश्चित करण्यात येईल.

**(सहा) परिवीक्षाधीन अधिका-यांचे सेवापुस्तकः**

परिवीक्षाधीन कालावधीमध्ये परिविक्षाधीन अधिका-यांचे सेवापुस्तक तयार करणे व जतन करण्यासंबंधात शासन निर्णय क्रमांकः ०२१५/ प्र. क्र. २०/१५/१८-ब, दिनांक ७ जुलै, २०१५ आणि शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. टिआरएन-०३१६/प्र.क्र.३६/१६/१८-ब, दिनांक २.०४.२०१९ मधील तरतूदी लागू राहतील.

**(सात) पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम कार्यक्रमाची अंमलबजावणी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्य सेवा परीक्षेतून निवड करण्यात आलेल्या गट-अ व गट-ब च्या अधिकाऱ्यांसाठी एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रम राबिवण्याबाबत या विभागाच्या उपरोक्त वाचा येथील अनुक्रमांक ३ येथील शासन निर्णयान्वये तरतूदी / मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

त्याचप्रमाणे सीपीटीपी-५ आणि सीपीटीपी-६ या तुकड्यांमधील परिवीक्षाधीन अधिका-यांना एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम (सीपीटीपी) अंतर्गत समाविष्ट केलेल्या गट "अ" आणि गट"ब" (राजपत्रित) पदांसाठीच्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांतर्गत घेण्यात येणा-या विभागीय परीक्षांबाबतचे नियम, २०१८, दिनांक १३.०४.२०१८ लागू राहतील.

**(आठ) परिवीक्षाधीन अधिका-यांसाठीचे रजा धोरण**

सीपीटीपी अंतर्गत प्रशिक्षण देण्यात उमेदवारांसाठी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक टिआरएन-०२१७/प्र.क्र.१०/सीपीटीपी, दिनांक १३.११.२०१७ अन्वये रजा धोरण निश्चित करण्यात आले आहे. सीपीटीपी-५ आणि सीपीटीपी-६ या तुकड्यांमध्ये प्रशिक्षणास रुजू होणारे उमेदवार, या उमेदवारांशी संबंधित विभागांचे नोडल अधिकारी, संबंधित प्रशासकीय विभाग, आणि प्रशिक्षण संस्था यांना या धोरणातील तरतूदींचे पालन करणे बंधनकारक असेल.

उपरोक्त शासन निर्णयामधील तरतूदींनुसार सीपीटीपी मध्ये प्रशिक्षण घेणा-या परिविक्षाधीन अधिका-यांना पायाभूत प्रशिक्षण , अनिवार्य संलग्नता, तांत्रिक प्रशिक्षण, पुनर्विलोकन आणि उजळणी या टप्प्यांच्या प्रशिक्षण कालावधीमध्ये नैमित्तिक रजेव्यतिरीक्त कोणत्याही स्वरुपाची रजा अनुज्ञेय असणार नाही. त्याचप्रमाणे जिल्हा संलग्नता टप्प्यादरम्यानही परिविक्षाधीन अधिका-यांना केवळ अपरिहार्य कारणांसाठीच प्रशिक्षण कालावधीमध्ये रजा मंजूर करण्यात येतील. प्रशिक्षणाच्या कोणत्याही टप्प्यामध्ये

गैरहजर राहिलेल्या परिवीक्षाधीन अधिका-यास त्याच्या गैरहजेरीच्या कालावधीतील प्रशिक्षणाचा अपूर्ण टप्पा पूर्ण करणे बंधनकारक राहील. यासंदर्भातील सविस्तर सूचनांसाठी उपरोक्त शासन निर्णयातील तरतूदींचे अवलोकन करण्यात यावे. संबंधित परिवीक्षाधीन अधिकाऱ्याने उपभोगलेल्या रजा कालावधी इतका त्याच्या परिवीक्षा कालावधीमध्ये वाढ होईल. अशा उमेदवारांचा परिवीक्षा कालावधी कमाल एका वर्ष इतका वाढविता येईल. संबंधित उमेदवारांचा या वाढीव कालावधीमध्ये परिवीक्षा कालावधी पूर्ण न झाल्यास त्याच्या सेवा समाप्त करण्यात येतील

**( नऊ )** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक टिआरएन-०२१८/प्र.क्र.०६/सीपीटीपी, दिनांक ७.०८.२०१८ अन्वये प्रशिक्षणास रुजू होण्यास उमेदवारांना काही निकषांच्या अधिन मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तथापि, शासनाला गरज पडल्यास मुदतवाढ रद्द करुन उमेदवारास प्रशिक्षणास हजर राहणेबाबत कळविण्याचे अधिकार शासनास राहतील.

**( दहा )** प्रशिक्षणास रुजू होणाऱ्या उमेदवारांनी उपरोक्त वाचा येथील अनुक्रमांक ४,५,६ आणि ७ येथे नमूद केलेल्या कागदपत्रांच्या मूळ प्रत व दोन छायांकित प्रतींसह उपस्थित रहावे. मागास प्रवर्गातील उमेदवारांपैकी ज्यांच्याकडे वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाही, अशा उमेदवारांनी शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दिनांक १२ डिसेंबर, २०११ मध्ये नमूद केल्यानुसार जातपडताळणीचा प्रस्ताव पडताळणी समितीला सादर केल्याबाबतचा पुरावा सादर करावा.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९२५१५४७३८५१०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VILAS RAMDAS
THAKUR

Digitally signed by VILAS RAMDAS THAKUR
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=cb156fb408217396128e8dcaeed3f6fa70d9fd209eb9efc83bdd68b308614534, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=c8b1e52c5c4f922ab6eb7a0b44101c838aea34f29fbff0aebe9d85c3de3468c2, ou=GENERAL ADMINISTRATION DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VILAS RAMDAS THAKUR
Date: 2019.09.25 15:51:32 +05'30'

**( वि. रा. ठाकूर )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई - ३२,
२. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२,
३. प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई - ३२,
४. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
५. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (**पत्राद्वारे),
६. महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रशिक्षण प्रबोधिनी (यशदा), पुणे,
७. संचालक, वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन संस्था (वनामती), नागपूर,
८. निवडनस्ती कार्यासन सीपीटीपी, सीपीटीपी-अ व सीपीटीपी-ब